# आयटी क्विझमध्ये सेंटर पॉईन्ट स्कूलला यश

नागपूर, भिलाई, रायपूर आणि दुर्ग या भागातील ९०० पेक्षा अधिक शाळांनी नागपूर येथे आयोजित टीसीएसच्या (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) आयटी-क्विझमध्ये भाग घेतला. यात सेंटर पॉईंट स्कूल, वर्धमाननगरची चमू विजेती ठरली. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात ही स्पर्धा मंगळवारी पार पडली. यात ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. स्पर्धेसाठी यंदा स्वचालन, प्रासंगिक ज्ञान, मशीन, शिक्षण आणि टेक्नॉलॉजी आदी विषय निश्चित करण्यात आले होते. पाचव्या फेरीनंतर सेंटर पॉईंट स्कूलचे अर्चित वेणूगोपाल, संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी विजय प्राप्त केला. त्यांना ६० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाऊचर पुरस्कार म्हणून देण्यात आले. उपविजेते ठरलेले कृष्णा पब्लिक स्कूल रायपूरचे गौरजा ऐरोन व यशराज मिश्रा यांना ४० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाऊचर देण्यात आले. व्हीएनआयटीचे संचालक डॉ. नरेंद्र चौधरी आणि नागपूरचे टीसीएस प्रमुख अरविंद कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.